**प्रेसनोट** **दि.२२/०३/२०१९**

## दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.

## पोलीसांनी वेळेत दखल घेतल्याने वाट चुकलेले मुल पालकांच्या ताब्यात

दत्तवाडी पोलीस स्टेशनचे सहा.पोलीसनिरीक्षक सुरेंद्र धुमाळे, पोलीस उप-निरीक्षक मनोज अभंग, पोलीस नाईक संतोष मेश्राम, नवनाथ राणे हे परिसरामध्ये शांतता व सुव्यवस्था राहावी या करीता पायी पेट्रोलिंगकरत असताना त्यांना काही लोकांनी येवुन सांगितले कि, एक लहान मुलगा म्हात्रे पुलावर बसलेला आहे. त्याचे बरोबर कोणीही नातेवाईक किंवा मोठी व्यक्ती नाही. म्हणुन जावुन त्या मुलाची माहिती घेतली असता एक मुलगा वय ०९ वर्षे रा. आंबेगाव असे सांगितले.त्याच्याकडे गोड बोलुन माहिती घेतली असता त्याच्या मना प्रमाणे घरातील मोठी माणसे ऐकत नाहीत व त्याचा हट्ट पुर्ण करत नाहीत म्हणुन तो घरातुन कोणाला काही न सांगता रेल्वेने कोठेतरी बाहेर निघुन जायचे असा निश्चय करुन बाहेर पडला परंतु पुणे रेल्वे स्टेशनकडे जायचा रस्ता त्याला न सापडल्याने तो म्हात्रे पुलावर चूकल्याने एकटा बसला होता. त्याच्या कडुन घरातल्यांचा नाव पत्ता माहित करुन घेवुन त्याचे आजोबा सुरेश इंगोले यांना बोलावुन घेतले व दोघांना सहा. पोलीस निरीक्षक सुरेंद्र धुमाळे, संजय चव्हाण, पोलीस उप-निरीक्षक मनोज अभंग यांनी समुपदेशनकरून ऑपरेशन मुस्कान या मोहीमे अंतर्गत या वाट चुकलेल्या लहान मुलाला त्याच्या पालकांकडे सुखरुप पोहचविले.हि कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शना खाली सपोनि शंकर धुमाळे, पोउनि मनोज अभंग, पोलीस नाईक संतोष मेश्राम, नवनाथ राणेयांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

